MAHARASHTRA STATE AIDS CONTROL SOCIETY
MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
www.mahasacs.org
एड्समुक्त महाराष्ट्र, स्वप्न नव्हे ध्येय!

एड्समुक्त महाराष्ट्र
एकच निर्धार
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचा समाचार






मनोगत



समाज प्रबोधनासाठी समाज व सरकार यांमध्ये उत्तम संवाद प्रस्थापित होणे, दोघांच्याही मनात परस्परांविषयी गाढ विश्वास निर्माण होणे, प्रसारित करण्यात येणारी माहिती अत्यंत अचूक, समजण्यास सोपी अशी असणे, प्रबोधन करणाऱ्याने सुद्धा स्वतःला सदैव 'अपडेट' ठेवणे अशा असंख्य गोष्टी अंतर्भूत असतात. 'महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था' ही सर्व उद्दिष्टं डोळ्यासमोर ठेऊन आपल्या नानाविध उपक्रमांची आखणी करीत असते. या सर्व अनुषंगाने संस्थेच्या कार्याची प्रगती वाचकांना 'निर्धार'च्या या अंकात वाचायला मिळेल. आपल्या बहुमोल सूचना आणि प्रतिक्रिया पाठवून वाचक नेहमीप्रमाणे संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढवीत राहतील अशी खात्री आहे.

– रमेश देवकर,
प्रकल्प संचालक

# एड्स जनजागृतीचे दमदार पाऊल

महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्था व 'न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन स्टाफ क्लब'चे अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृतीचा भव्य कार्यक्रम सांगली जिल्ह्यातील जत येथील श्री यल्लमा देवीच्या यात्रेतून नुकताच पार पाडण्यात आला. दरवर्षी मार्गशीर्ष कृष्ण दशमी ते द्वादशी या तीन दिवसात भरणाऱ्या या यात्रेस महाराष्ट्र व कर्नाटकातून ४ ते ५ लाख भाविक भेट देतात. सांगलीत एचआयव्ही/ एड्स रुग्णांची संख्या सर्वाधिक असल्याने या यात्रेमध्ये एड्स जनजागृती आवश्यक आहे. यात्रा परिसर ८० ते १०० एकर असून यात गुरांचा बाजार, ३-४ सिनेमा टॉकीज, तमाशांचे फड, खाणेपिणे व इतर दुकाने असतात. दर्शनासाठी येणारे काही भाविक तंबू टाकून राहतात तर दररोज दर्शनासाठी येणारे इतर भाविकही असतात.

या कार्यक्रमात जनजागृतीसाठी जत पंचायत समिती व श्री यल्लमा देवी प्रतिष्ठान यांचे मोठे सहकार्य लाभले. 'महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्थे'तर्फे संपूर्ण जगजागृतीपर प्रचार साहित्य उपलब्ध करून दिले गेले. यात १०० बॅनर्स, १ लाख माहितीपत्रके, एडस् चिन्हांचे (रेड रिबन) ५० हजार



बिल्ले, ५० हजार माहिती पुस्तके व सांगली जिल्ह्यातील एडस् संबंधी सुविधा केंद्रांची माहिती असणारी पत्रके यांचा समावेश होता. बसस्टँड, सरकारी कार्यालये, इस्पितळे, पोलीस स्टेशन, चौक, भाजी मंडई अशा ठिकाणी संपूर्ण जत परिसरात बॅनर्स लावण्यात आली. दर्शनाच्या रांगेत तसेच मुक्कामी भाविकांना माहितीपत्रके व एडस् चिन्हांचे बिल्ले वाटण्यात आले. छोटी माहिती पुस्तके व एडस् तपासणी केंद्राचे पत्ते हे रिक्षा, टेम्पो, सुमो, ट्रक, बस चालकांना तसेच गुरेबाजारात वाटण्यात आली. तमाशांचे फड, सिनेमा थिएटर, खरेदीस येणारे भाविक, दुकानदारांना माहितीपत्रके वाटण्यात आली. जत पंचायत समितीने यात्रेमध्ये उपलब्ध करून दिलेल्या स्टॉलवर पोस्टर्सचे प्रदर्शन भरविण्यात आले व आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले. भाविकांना तातडीची उपचारपद्धती व एडसविषयी शंकांचे निरसन ही दोन्ही कार्ये या केंद्रात सुरू होती. अनेक भाविकांनी याचा लाभ घेतला.

या सर्व कार्याचे जतच्या स्थानिक मान्यवरांकडून कौतुक करण्यात आले. 'यात्रेच्या ठिकाणी जनजागृती कार्यक्रम एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रथमच राबविला गेला असावा,' अशी प्रतिक्रिया गटविकास अधिकारी श्रीमती इटाई यांनी दिली. 'जतमध्ये एडस् जनजागृतीची गरज आणखी ५-७ वर्षे लागेल,' असे स्थानिक वकील श्री. श्रीपाद अष्टेकर म्हणाले. सतत ५ दिवस (२१ ते २५ डिसेंबर) ११ कार्यकर्ते सकाळी ८ ते पहाटे २ पर्यंत जनजागृतीचे काम करीत होते. एडस्बद्दलची माहिती तरुण-वृद्ध स्त्रीपुरुषांना दिली गेली.

– चंद्रकांत कुलकर्णी
न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन स्टाफ क्लब, मुंबई

उपक्रम



46-60.indd 57 26/05/2009 5:26:25 PM

विशेष लेख

# ‘महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे’च्या कार्यामध्ये
# आंतरराष्ट्रीय संस्थांचा सहभाग

एचआयव्ही/एड्सविषयी समाजप्रबोधन करण्याच्या ‘महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे’च्या कामी अनेक नामांकित आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्था आपला हातभार लावीत आहेत. त्यांच्या सहकार्याने आपले उद्दिष्ट पार पाडीत असलेल्या महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या कार्याचा लेखाजोखा ‘निर्धार’च्या वाचकांसाठी येथे मांडीत आहोत...




महाराष्ट्रातील एचआयव्ही/एड्सच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे प्रयत्न अनेक पातळ्यांवर सुरू असतात. अगदी तळागाळातल्या समाजघटकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांच्याशी त्यांच्या भाषा-संस्कृतीनुसार संवाद साधणे यासाठी विविध योजना, उपक्रम, मोहीम, अभियान संस्थेतर्फे नियमितपणे राबविले जातात. लैंगिकतेकडे पाहण्याचा आपल्या समाजाचा दृष्टीकोन पुरेसा निकोप नसल्यामुळे लोकांच्या मनात आपल्याविषयी विश्वास निर्माण करणे व त्यानंतर एचआयव्ही/एड्सविषयी त्यांचे प्रबोधन करणे हे दोन मुख्य टप्पे या कामी पार पाडावे लागतात. ‘महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे’च्या या कार्यात गेल्या काही वर्षांपासून अनेक नामांकित व आंतरराष्ट्रीय अनुदानित सामाजिक संस्थादेखील हातभार लावीत आहेत.

युनिसेफ, पाथ फाईंडर, ॲव्हर्ट सोसायटी, ट्रकर्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (TCI), जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटी (JHU), कर्नाटक हेल्थ प्रमोशन ट्रस्ट (KHPT), फॅमिली हेल्थ इंटरनॅशनल (FHI) या काही राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय संस्था ‘महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे’च्या सहयोगी संस्था म्हणून राज्यात खेड्यापाड्यात जाऊन काम करीत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव, नियोजनबद्ध आखणी, दर्जेदार कार्यप्रणाली या त्रिसूत्रीमुळेच आज या संस्था जिल्हास्तरावर वाखाणण्याजोगे काम करीत आहेत. या संस्था लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्प (TI), पालकांपासून अर्भकास होणारा एचआयव्ही संसर्ग प्रतिबंध कार्यक्रम (PPTCT), ड्रॉप इन सेंटर्स (DIC), ट्रकर्स प्रकल्प, वर्क प्लेस इंटरव्हेंशन (WPI), समुदाय देखभाल केंद्र (CCC) असे विविध प्रकल्प स्थानिक अशासकीय संस्थांच्या मदतीने राज्यभर राबवीत आहेत.

## लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्पातील सहभाग

या सर्व प्रकल्पांपैकी लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्प हा सर्वात महत्त्वपूर्ण उपक्रम असून तो समाजातील अति जोखमीचे गट म्हणजे देहविक्री करणाऱ्या महिला, समलिंगी संभोग करणारे पुरुष, ट्रकर्स, स्थलांतरित कामगार, मादकद्रव्यांचे सेवन करणारे युवा गट, तृतीय पंथी गट यांना लक्ष्यवेध करून राबविला जातो. पाथ फाईंडर, फॅमिली हेल्थ इंटरनॅशनल, कर्नाटक हेल्थ प्रमोशन ट्रस्ट, ट्रकर्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, ॲव्हर्ट सोसायटी, मुंबई डिस्ट्रिक्ट एड्स कंट्रोल सोसायटी या संस्था राज्यातील एकूण १९ जिल्ह्यांमधील सुमारे ८३ स्थानिक अशासकीय संस्थांच्या मदतीने हा प्रकल्प राबवीत आहेत. यात अति जोखमीच्या गटातील व्यक्तिंना वैयक्तिक समुपदेशन, कंडोम वापराविषयी प्रोत्साहन, स्वतःच्या आरोग्याविषयी जागरुकता, रोजगाराच्या संधींविषयी मार्गदर्शन अशी विविध कामे केली जातात. या प्रकल्पांतर्गत सहयोगी संस्थांकडून झालेले गटनिहाय साध्य पुढीलप्रमाणे आहेः

| गट | साध्य लोकसंख्या |
|---|---|
| देहविक्री करणाऱ्या महिला | १,१०,६८९ |
| समलिंगी संभोग करणारे | ३८,०११ |
| मादक द्रव्यांचे सेवन करणारे | २,००० |
| स्थलांतरित कामगार | १०,५७,७०१ |
| ट्रकर्स | २,३४,७३६ |

## PPTCT उपक्रमामध्ये युनिसेफचा सहभाग

युनिसेफ ही संस्था राज्यभरात ‘पालकांपासून अर्भकांस होणारा एचआयव्ही संसर्ग प्रतिबंध कार्यक्रम’ (PPTCT) या उपक्रमाच्या अंमलबजावणीसंबंधी मार्गदर्शन व संनियंत्रण करण्याचे कार्य करते. कार्यक्रमातील संबंधित गटांना प्रशिक्षण, कार्यशाळा तसेच पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) कार्यक्रमाद्वारे खाजगी हॉस्पिटल, प्रसूतीगृह, लॅबोरेटरीज, खाजगी कंपन्या (जेथे ३००० पेक्षा अधिक कामगार कार्यरत आहेत) तेथे एड्ससंबंधी माहिती, चाचणी व समुपदेशन सुविधा (ICTC) केंद्र सुरू केलेले आहेत, जेणेकरून लोकांना खाजगी रुग्णालयातही माफक शुल्कात एड्सवरील सुविधा उपलब्ध होऊ शकतील. आता हा PPP कार्यक्रम ॲव्हर्ट सोसायटी अंतर्गत तांत्रिक सहाय्यता विभागातर्फे (TSU) एकूण ५६ केंद्रांवर राबविला जात आहे.

## ॲव्हर्ट सोसायटीचा सहभाग

ॲव्हर्ट सोसायटी गेली १० वर्षे राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये विविध कार्यक्रम राबवीत आहे. यात अति जोखमीच्या गटासाठी १३ लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्पांचा समावेश आहे.

कामगारांमध्ये एड्सविषयी जागृतीसाठी ९ ठिकाणी खाजगी कंपन्यांमध्ये वर्क प्लेस इंटरव्हेंशन उपक्रम राबवीत आहे. केअर ॲंड सपोर्ट विभागाअंतर्गत



46-60.indd 58 26/05/2009 5:27:03 PM

अंमली पदार्थ व्यसनाधीन युवकांसाठी एड्सविषयी समुपदेशन, चाचणी व रोजगाराच्या संधीविषयी मार्गदर्शनासाठी एक समुदाय देखभाल केंद्र (CCC) सुरू आहे. एचआयव्ही संसर्गित रुग्णांच्या सुविधेसाठी त्यांच्या घरी भेट देऊन आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी २ होम बेस्ड केअर सेंटर (HBC) तर एचआयव्ही संसर्गित मुले व एचआयव्ही संसर्गित कुटुंबातील निराधार मुलांना आधार देण्यासाठी तसेच शैक्षणिक सुविधा, आहार, समुपदेशन, औषधोपचार देण्यासाठी ऑर्फन अँड व्हल्नरेबल चिल्ड्रेन (OVC) कार्यक्रम राबविला जात आहे. एचआयव्ही संसर्गित रुग्णांची निगा व देखभाल यासाठी ९ ड्रॉप इन सेंटर्स (DIC) तसेच प्रत्यक्ष गावात जाऊन लोकांना एचआयव्ही/एड्सविषयी माहिती देऊन त्यांना आवश्यक त्या संदर्भसेवा पुरविण्यासाठी ४ लिंक वर्कर्स स्कीम कम्युनिटी मोबिलायझेशन उपक्रम सुमारे ४ जिल्ह्यातील ४०० गावात सुरू करण्यात येत आहे.

## कर्नाटक हेल्थ प्रमोशन ट्रस्टचा सहभाग

एड्स संसर्गित व्यक्तिंना चांगले आयुष्य जगता यावे, त्यांच्यात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा यासाठी आवश्यक ते समुपदेशन, औषधोपचार यांसाठी लागणाऱ्या संदर्भसेवा पुरविण्यासाठी 'कर्नाटक हेल्थ प्रमोशन ट्रस्ट' राज्यात समुदाय देखभाल केंद्र कार्यक्रम राबवीत आहे. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मान्यतेने कर्नाटक हेल्थ प्रमोशन ट्रस्टतर्फे महाराष्ट्र (४०) व कर्नाटक (३७) या दोन राज्यात एकूण ७७ समुदाय देखभाल केंद्रे चालविली जात आहेत.

## जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटीचा सहभाग

राज्यातील जनसामान्यांपर्यंत एचआयव्ही/एड्सविषयीची शास्त्रीय माहिती पोहोचण्यासाठी विविध जनजागृती अभियान राबविले जातात. तसेच यासाठी विविध प्रचार साहित्याची उदा. लिफलेट्स, पुस्तिका, बॅनर्स, पोस्टर्स, टीव्ही स्पॉट इत्यादिंची निर्मिती केली जाते. असे माहितीपर साहित्य तयार करण्यासाठी राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेद्वारा सूचित 'जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटी' ही संस्था आवश्यक ते सहकार्य करीत आहे.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या कार्याला लाभलेला आंतरराष्ट्रीय संस्थांचा असा सखोल सहभाग 'वसुधैव कुटुम्बकम्' या संकल्पनेची आठवण करून देतो. उद्दिष्ट कितीही आव्हानात्मक असू द्या, परस्पर सहकार्य उत्तम असेल तर ते साध्य झाल्याशिवाय कसे राहील?

-डॉ. सुरेश गुप्ता (अतिरिक्त प्रकल्प संचालक, म.रा.ए.नि.सो.)

# एक छोटासा प्रयत्न...

एचआयव्ही/ क्षयरोग- एचआयव्ही संसर्गित व्यक्तिमध्ये क्षयरोग होण्याचे प्रमाण अधिक आहे. एचआयव्हीमुळे प्रतिकार शक्ती कमी होते व त्यामुळे क्षयरोग व अनेक संधीसाधू आजार व्यक्तिवर आक्रमण करतात. परंतु क्षयरोग झालेल्यांना एचआयव्ही बाधा असेलच असा याचा अर्थ होत नाही. दोन्ही आजार एकत्र असल्यास मात्र रुग्णता व मृत्यू याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. यामध्ये DOTS उपचाराने क्षयरोग बरा होतो तर ART उपचाराने HIV संसर्गित व्यक्तिचा आजार नियंत्रित करण्यात येतो. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेत HIV/TB Consultant या पदावर कार्यरत असलेले डॉ. दिलीप देशमुख यांनी ही माहिती दिली.




हे सर्व शासकीय यंत्रणेत व्यवस्थितपणे घडवून आणण्याच्या दृष्टीने Intensified HIV TB Package राबविण्यात येत आहे. डॉ. दिलीप देशमुख यांनी याच packageचे सुटसुटीत रूपांतर flowchart मध्ये केले आहे. या छोट्या प्रयत्नाचे कौतुक राष्ट्रीय स्तरावर NACO ने केले असून असाच flowchart संपूर्ण देशात वापरण्याचा विचार NACO करत आहे.

- उपसंचालक, (माहिती, शिक्षण व संवाद)



46-60.indd 59 26/05/2009 5:27:08 PM

स्वयंसेवी संस्था

# एचआयव्ही संसर्गित स्त्रियांनी स्थापन केलेली सौदामिनी

मानसिकदृष्ट्या न खचता, इतरांवर अवलंबून न राहता नव्यानं पुन्हा उभं राहण्याचं सामर्थ्य असलेल्या या प्रत्येक स्त्रीचं आयुष्य म्हणजे एकेक स्वतंत्र वीरगाथाच ठरावी!




सौदामिनी (नेटवर्क ऑफ पॉझिटिव्ह विमेन ॲन्ड चिल्ड्रेन) या संस्थेची स्थापना एचआयव्ही संसर्गित स्त्रियांनी एकत्र येऊन २२ नोव्हेंबर २००५ रोजी केली. महाराष्ट्र राज्यातील एचआयव्ही संसर्गित स्त्रिया व मुले यांच्या जीवनमान व राहणीमानाचा दर्जा उंचावणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आज संस्थेत ४,००० एचआयव्ही पॉझिटिव्ह स्त्रिया व २,५०० एचआयव्ही पॉझिटिव्ह मुले सदस्य आहेत. यांच्यासाठी संस्थेअंतर्गत एचआयव्ही संसर्गित स्त्रिया व मुलांच्या आधारगट सभांचे आयोजन करणे तसेच एचआयव्ही संसर्गित स्त्रिया व मुलांना आहार पुरवणे, त्यांना सकारात्मक जीवन जगण्याबद्दल व मूलभूत हक्कांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन करणे इ. कार्ये केली जातात. एचआयव्ही संसर्गित स्त्रियांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने त्यांचे बचतगट स्थापन केले असून त्यांचे विवाह जुळवून दिले जातात. त्याचबरोबर प्रकल्पांतर्गत स्त्रियांचे कलाकौशल्य वाढविण्यास प्रशिक्षणही दिले जाते. संस्थेमार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावर फ्रान्स, जपान, कॅनडा, कोलंबो, फिनलॅन्ड येथे संस्थेच्या कार्याची ओळख करून देण्यात आली आहे. एचआयव्ही संसर्गित स्त्रिया व मुलांना कायदे-विषयक संरक्षण मिळण्याकरिता महाराष्ट्र राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून मोहीम राबविण्यात आल्या आहेत.

तसेच त्यांच्या प्रश्नाबाबत प्रसारमाध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येते. 'महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे'ची कार्यकारी समिती, एचआयव्ही/टीबी समिती, पुणे, कम्युनिटी ॲडवायजरी बोर्ड, जॉन हाफकिन युनिव्हर्सिटी, बी. जे. मेडीकल पुणे या विविध समितीवरील स्त्रिया संस्थेचे प्रतिनिधित्व करीत आहेत. संस्थेअंतर्गत स्त्रिया ग्रामीण भागात एचआयव्ही/ एड्सबाबत समाजप्रबोधन करतात. 'महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था' अनुदानित पीपीटीसीटी प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यातील २१ एकात्मिक सल्ला व समुपदेशन केंद्रात ३७ एचआयव्ही पॉझिटिव्ह स्त्रिया फील्ड वर्कर म्हणून कार्यरत आहेत. एचआयव्ही पॉझिटिव्ह गरोदर माता व नवजात बालकांना नेव्हीरॅपीन औषधाचा लाभ मिळवून देण्याचे तसेच माता व बाळाची एचआयव्ही तपासणी करण्याचे कार्य पीपीटीसीटी प्रकल्पांतर्गत केले जाते. पुण्यात येणाऱ्या स्थलांतरित कामगारांकरिता हस्तक्षेप प्रकल्प राबवित असून यामध्ये कामगारांना एचआयव्ही/ एड्स/ गुप्तरोग/ क्षयरोग विषयक सेवा व निरोध पुरविले जातात. ■

संस्थेस महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेने पीपीटीसीटी प्रकल्प व स्थलांतरित कामगारांसाठी हस्तक्षेप प्रकल्प देऊन कार्य करण्याची संधी दिली आहे.

संस्थेचे कार्य लक्षात घेऊन स्थानिक आमदारांनी संस्थेच्या कार्यालयास जागा उपलब्ध करून दिली आहे.

पुणे कॉंग्रेस समितीने जागतिक महिला दिनानिमित्त संस्थेतील स्त्रियांच्या कार्याचा सत्कार केला.

साईसेवा मंडळ, मुक्तांगण संस्था, अमाडा ट्रस्ट यांनी एचआयव्ही संसर्गित स्त्रियांना स्वयंरोजगारास अनुदान दिले आहे.

कविता

## संदेश

न जाणे कशी झाली उत्पत्ती या एड्सची
भोगावी लागते सजा सर्वांनाच त्याची!!
जो कुणी येतो संपर्कात ह्याच्याशी,
बाधा होते त्याला एचआयव्ही एड्सची!!
असो शरीर कितीही दणकट वा सशक्त,
एड्सचा विषाणू करतो त्याला फस्त!!
गरज असते त्याला फक्त औषधोपचाराची
घ्यावी अवश्य भेट एकात्मिक सल्ला व
चाचणी केंद्राची!!
रोज सेवन करून औषधोपाण्याचे,
आवश्यकताही असते नियमित व्यायाम
करण्याची!!
हेच एक साधन आपली प्रतिकारशक्ती
वाढण्याचे,
नीट लक्षात घ्या हा संदेश आपले आरोग्य
जोपासण्याचे!!

- रवि चिंतावर (प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. सावंगी (मेघे), वर्धा)

निवेदनः 'महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे'च्या विविध जनजागृतीपर योजनांची माहिती संस्थेच्या 'निर्धार' या मुखपत्राद्वारे नियमित प्रसिद्ध होत आहे. त्याबाबत आपल्या प्रतिक्रिया व सूचनांचे मनापासून स्वागत करीत आहोत. आपल्या प्रतिक्रिया, सूचना तसेच एचआयव्ही/एड्ससंबंधी लेख इ. साहित्य कृपया खालील पत्त्यावर पाठवाः


महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र शासन,
ॲक्वर्थ स्कूल, आर. ए. किडवई मार्ग, वडाळा (प), मुंबई ३७, दूरध्वनीः ०२२-२४११३०९७

माहिती, शिक्षण व संवाद विभाग, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडून जनहितार्थ प्रसारित

MAHARASHTRA STATE AIDS CONTROL SOCIETY
MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
www.mahasacs.org
एड्समुक्त महाराष्ट्र, स्वप्न नव्हे ध्येय!





46-60.indd 60 26/05/2009 5:27:10 PM